# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. ८७/२०२०

**विषय :- कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मा.पंतप्रधान, भारत सरकार यांच्या आवाहनास अनुसरुन कृती करण्याबाबत.**

शासनाने कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि. १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

देशातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेऊन मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी येत्या रविवार, दिनांक २२ मार्च, २०२० रोजी सकाळी ७.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत **जनता कर्फ्यु** ही नवीन संकल्पना मांडुन देशवासीयांनी स्वयंशिस्त पालन करण्याचे आवाहन केले आहे. या दिवशी सर्व नागरीकांनी घराबाहेर न पडता दिवसभर घरातच राहुन कोरोना विषाणूची लागण होण्यापासून स्वत:चा व परिवाराचा बचाव करावा तसेच या विषाणूचा प्रसार इतरत्र होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विद्यापीठ आवारात राहणाऱ्या सर्वांना सुचित करण्यात येते की, सदर दिवशी **जनता कर्फ्युचे** पालन करावे. सदरील दिवशी घराबाहेर न पडता सायंकाळी ५.०० वाजता संपूर्ण देशावर आलेल्या कोरोनाच्या संकटाचा सामना करणाऱ्या सर्व सरकारी यंत्रणा, खास करुन जीवाची पर्वा न करता निरंतर समाज सेवा करणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, नर्स, पोलीस यंत्रणा, महानगरपालिकेतील कर्मचारी आणि अन्य सेवेकरी वर्ग यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपआपल्या घराच्या बाल्कणी, टेरेस, खिडकीतून ५ मिनिटे टाळ्या वाजवून अथवा थाळी/घंटानाद करुन त्यांच्या कार्याला सलाम करुयात.

मा.पंतप्रधान यांनी केलेल्या आवाहनाला आपण सर्वजण मिळून प्रतिसाद देऊया व आपण सर्व नागरीक मिळून या संकटावर मात करुया.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/१५५४
दिनांक : २०/०३/२०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

} आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.